# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

## School Monthly Progress Report - July 2026

## ACADEMIC ACHIEVEMENT

### Grade 8 and 9 Assessments

Periodic Test 1 (PT-1) was conducted for Grade 8 and 9, covering 40 marks and benefiting around 200 students. The assessment was designed collaboratively by teachers and the academic leadership team to ensure alignment with the syllabus and a balance across knowledge, understanding, and application. As the first of four periodic tests, PT-1 serves as an early benchmark for student performance. The results help teachers assess learning levels, identify gaps, and plan remedial support. Upcoming tests (PT-2, PT-3, and PT-4), each of 80 marks, will be conducted with syllabus completion planned by December.

### इयत्ता ८ आणि ९ मूल्यमापन

इयत्ता ८ आणि ९ साठी पीरियॉडिक टेस्ट १ (PT-1) ४० गुणांची घेण्यात आली, ज्यामध्ये सुमारे २०० विद्यार्थी सहभागी झाले. ही परीक्षा शिक्षक आणि शैक्षणिक नेतृत्व टीमने एकत्रितपणे तयार केली होती, ज्यामुळे अभ्यासक्रमाशी सुसंगतता आणि ज्ञान, समज व अनुप्रयोग यांचा समतोल राखला गेला. ही चार परीक्षांपैकी पहिली परीक्षा असून विद्यार्थ्यांसाठी प्रारंभिक मोजमाप ठरली. निकालांमुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांची पातळी समजून घेता येते, उणिवा ओळखता येतात आणि आवश्यक त्या पूरक वर्गांचे नियोजन करता येते. पुढील PT-2, PT-3 आणि PT-4 (८० गुण) डिसेंबरपर्यंत घेतल्या जातील.

### Digital Skills Professional Development



The Digital Skills Professional Development session was conducted on 4th July 2026 with 8 participants, including one Team Lead and seven teachers. The session focused on reviewing the progress and execution of lesson plans, providing clear guidance to improve classroom implementation. Teachers were introduced to Code.org as a key resource for upcoming units, helping them plan engaging and structured digital lessons. Information about external student competitions was also shared to encourage participation and skill development.
Dedicated time was provided for teachers to work on performance tasks, promoting collaboration and effective planning. Additionally, certificate courses were assigned to enhance teachers' knowledge and preparedness for future lessons. The session concluded with constructive feedback and support, ensuring teachers felt confident moving forward.
Overall, the session was insightful and helped teachers gain clarity, improve readiness, and strengthen their approach to teaching Digital Skills effectively.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

**डिजिटल स्किल्स व्यावसायिक विकास**

४ जुलै २०२६ रोजी डिजिटल स्किल्स व्यावसायिक विकास सत्र आयोजित करण्यात आले होते. या सत्रात ८ जण सहभागी झाले होते, ज्यामध्ये १ टीम लीड आणि ७ शिक्षकांचा समावेश होता. सत्राचा मुख्य उद्देश धड्यांच्या नियोजनाची प्रगती आणि त्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे हा होता. शिक्षकांना Code.org या प्लॅटफॉर्मची ओळख करून देण्यात आली, ज्यामुळे आगामी युनिट्ससाठी प्रभावी नियोजन करता येईल.

विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या बाह्य स्पर्धांची माहितीही देण्यात आली, ज्यामुळे त्यांचा सहभाग वाढेल. शिक्षकांना परफॉर्मन्स टास्क तयार करण्यासाठी वेळ देण्यात आला, ज्यामुळे सहकार्याने काम करण्यास मदत झाली. तसेच, शिक्षकांसाठी काही प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुचविण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या अध्यापन कौशल्यात वाढ होईल.

सत्राच्या शेवटी मार्गदर्शन आणि अभिप्राय देण्यात आला. एकूणच, हे सत्र उपयुक्त ठरले आणि शिक्षकांची तयारी अधिक मजबूत झाली.

**Tracking Student Mastery PD**



A Professional Development (PD) session titled “Tracking Student Mastery” was conducted by Banu and Nilesh along with the leadership team, with 8 participants in total. The session focused on helping teachers and teacher leaders understand how to effectively track student mastery after teaching a concept, rather than simply marking syllabus completion.

The session aimed to build a shared understanding of what “mastery” looks like in classroom practice. It emphasized shifting classroom observations from lesson delivery to actual student learning outcomes. Teachers were guided on using a structured mastery-tracking approach to assess student understanding more accurately.

This approach enables teacher leaders to identify learning gaps objectively during classroom observations and provide targeted, meaningful feedback to teachers. It also ensures consistency in evaluating mastery across different classes and subjects.

Overall, the session strengthened educators’ ability to focus on student learning outcomes and improved the quality of instructional support and observation practices.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

**विद्यार्थी प्रगती मोजमाप – व्यावसायिक विकास सत्र**

“Tracking Student Mastery” या विषयावर बानू आणि निलेश यांनी नेतृत्व पथकासह व्यावसायिक विकास (PD) सत्र आयोजित केले, ज्यात एकूण ८ सहभागी होते. या सत्राचा उद्देश शिक्षकांना फक्त अभ्यासक्रम पूर्ण करण्याऐवजी विद्यार्थ्यांनी संकल्पना कितपत आत्मसात केली आहे हे प्रभावीपणे मोजण्यास सक्षम करणे हा होता.

या सत्रामध्ये “मास्टरी” म्हणजे काय याची एकसमान समज निर्माण करण्यावर भर देण्यात आला. अध्यापन पद्धतीपेक्षा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिकण्यावर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. या पद्धतीमुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शिकण्यातल्या उणिवा ओळखून योग्य मार्गदर्शन देता येते आणि मूल्यमापनात सुसंगतता राखली जाते.

## Multidisciplinary Approach in Class

A total of six Mathematics–Art integrated sessions on “Compass Painting” were conducted for Grade 6 students, benefiting 160 learners. The sessions began with a Mathematics introduction to circle concepts such as concentric, intersecting, internally tangent, and externally tangent circles. This was followed by an Art activity where students used a compass, paintbrushes, and paints to create artistic designs based on these concepts.

The hands-on approach enabled students to connect mathematical understanding with creative expression. Reflection activities and pair-share discussions encouraged students to think critically about their learning and articulate their ideas. The sessions enhanced conceptual understanding, creativity, observation skills, fine motor skills, and spatial reasoning.



Overall, the multidisciplinary approach made learning engaging and meaningful. It demonstrated the effectiveness of integrating Mathematics with Art and highlighted the importance of continuing such project-based, experiential learning strategies across different grades..

**बहुविषयक अध्यापन**

इयत्ता ६ साठी “कंपास पेंटिंग” या विषयावर गणित आणि कला एकत्रित करून ६ सत्रे घेण्यात आली, ज्याचा लाभ १६० विद्यार्थ्यांना झाला. सत्राच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना केंद्रवर्ती, छेदणारे, अंतर्गत स्पर्श करणारे आणि बाह्य स्पर्श करणारे वर्तुळे या गणितीय संकल्पनांची ओळख करून देण्यात आली. त्यानंतर कला सत्रात विद्यार्थ्यांनी कंपास, ब्रश आणि रंगांचा वापर करून विविध वर्तुळांवर आधारित आकर्षक कलाकृती तयार केल्या.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना गणित आणि सर्जनशीलता यांचा प्रत्यक्ष संबंध समजला. चर्चेद्वारे आणि प्रतिबिंबात्मक प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले, ज्यामुळे त्यांची चिकित्सक विचारशक्ती वाढली. या सत्रांमुळे संकल्पनात्मक समज, सर्जनशीलता, निरीक्षण कौशल्ये, सूक्ष्म हालचाली आणि अवकाशीय समज यांचा विकास झाला.

एकूणच, हा बहुविषयक उपक्रम आनंददायी आणि परिणामकारक ठरला असून अशा अनुभवाधारित शिक्षण पद्धती पुढेही राबविणे आवश्यक आहे

## Marathi PD Session

A Professional Development (PD) session on Performance Tasks was conducted on 13 July 2026 by Swati and Surekha for Marathi and Hindi teachers, with 7 participants. The session focused on building teachers' understanding of Performance Tasks and differentiating them from Projects. It highlighted the importance of Performance Tasks in assessing students' ability to apply knowledge and skills meaningfully. Teachers were guided on designing effective, learning-aligned Performance Tasks and were given dedicated time to plan subject-specific tasks. Continuous support and feedback were provided to refine their designs. The session enhanced teachers' clarity, confidence, and ability to create meaningful assessments. As a follow-up, teachers will implement these tasks in their classrooms, after which review sessions will be conducted. Teachers will share experiences and best practices, while student learning and engagement will be evaluated to strengthen the effective use of Performance Tasks.

### मराठी पीडी

१३ जुलै २०२६ रोजी स्वाती आणि सुरेखा यांनी मराठी व हिंदी शिक्षकांसाठी परफॉर्मन्स टास्क या विषयावर व्यावसायिक विकास (PD) सत्र घेतले. या सत्रात एकूण ७ शिक्षक सहभागी झाले होते. सत्रात प्रोजेक्ट आणि परफॉर्मन्स टास्क यातील फरक स्पष्ट करण्यात आला तसेच परफॉर्मन्स टास्कचे उद्दिष्ट आणि महत्त्व समजावून सांगण्यात आले.

शिक्षकांना अभ्यासक्रमाशी सुसंगत आणि अर्थपूर्ण परफॉर्मन्स टास्क कसे तयार करायचे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यांना स्वतंत्र वेळ देऊन विषयानुसार टास्क तयार करण्याची संधी देण्यात आली आणि त्या प्रक्रियेत आवश्यक ते मार्गदर्शन व अभिप्राय देण्यात आला. यामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास आणि समज वाढली.

पुढील टप्प्यात शिक्षक हे टास्क वर्गात राबवतील. त्यानंतर पुनरावलोकन सत्रे घेऊन अभिप्राय दिला जाईल. तसेच शिक्षक आपले अनुभव शेअर करतील आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्याचे व सहभागाचे मूल्यांकन करून अध्यापन अधिक प्रभावी केले जाईल.

## Model United Nations (MUN) Activity

A two-day **Model United Nations (MUN)** activity on the **1991 Balance of Payments (BoP) Crisis at Don Bosco school** was conducted on **17th and 18th July 2026**, comprising **5 sessions and benefiting 6 students from Grades 7, 8, and 9**. Along with the information provided by MUN, the students researched the causes, challenges, and possible solutions to the crisis and assumed the roles of political representatives



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

to present and discuss different perspectives. The activity included discussions on economic policies, foreign investment, opportunities for small businesses, and a brief discussion on Kashmir-related issues and the challenges faced by Kashmiri Pandits.

The activity encouraged students to engage in research, role play, debate, and discussion, strengthening **critical thinking, communication, public speaking, analytical reasoning, research, and problem-solving skills**. It also helped students build confidence in expressing their ideas and understanding multiple perspectives.

Overall, the MUN provided an engaging, experiential learning opportunity that connected classroom learning with real-world issues.

**मॉडेल युनायटेड नेशन्स (MUN) उपक्रम**

17 आणि 18 जुलै 2026 रोजी डॉन बॉस्को शाळेत 1991 च्या Balance of Payments (BoP) संकटावर दोन दिवसीय MUN उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात इयत्ता 7 वी, 8 वी आणि 9 वीतील 6 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी संकटाची कारणे, आव्हाने व संभाव्य उपाय यांचा अभ्यास करून विविध राजकीय प्रतिनिधींच्या भूमिका साकारल्या आणि चर्चा व वादविवाद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची संशोधन, चिकित्सक विचार, संवादकौशल्य, सार्वजनिक वक्तृत्व, विश्लेषणात्मक विचार आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित झाली.

एकूणच, MUN हा विद्यार्थ्यांना वास्तविक जीवनातील विषयांशी जोडणारा आणि अनुभवातून शिकण्याची संधी देणारा प्रभावी उपक्रम ठरला.

## Colours week In Pre-Primary

During **Pre- Primary Colour Week**, children came dressed in colourful outfits, creating a joyful and engaging classroom environment. They revised the primary colours—red, blue, and yellow—through games, movement activities, colour sorting, and discussions. Children also explored secondary colours by mixing paints to create orange, purple, green, pink, and brown, promoting creativity, observation, fine motor skills, and collaborative learning.



## रंग आठवडा (पूर्व-प्राथमिक विभाग)

**पूर्व-प्राथमिक रंग आठवडा** उत्साहात साजरा करण्यात आला. या आठवड्यात मुलांनी रंगीबेरंगी पोशाख परिधान करून आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण केले. विविध खेळ, हालचालींवरील उपक्रम, रंग वर्गीकरण आणि चर्चेद्वारे त्यांनी प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) यांची उजळणी केली. तसेच रंग मिसळण्याच्या प्रत्यक्ष उपक्रमातून त्यांनी नारिंगी, जांभळा, हिरवा, गुलाबी आणि तपकिरी हे दुय्यम रंग तयार केले. या अनुभवाधारित उपक्रमांमुळे मुलांची सर्जनशीलता, निरीक्षण क्षमता, सूक्ष्म हालचालींची कौशल्ये आणि सहकार्याची भावना विकसित झाली.

# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

## KG Assessments

The **Unit 1A & 1B Assessments** for **K.G. grade** were conducted from **28th July to 31st July 2026** to evaluate children's understanding of Phonics and Numeracy concepts. Age-appropriate, activity-based assessments were carried out using flashcards, manipulatives, concrete materials, and guided interactions. These assessments provided opportunities for children to demonstrate their learning in a supportive and engaging manner while allowing teachers to identify individual strengths and areas requiring additional support. Overall, the activities and assessments encouraged active participation, built confidence, and strengthened children's foundational learning through meaningful, hands-on experiences.

## के.जी. मूल्यमापन

**के.जी. इयत्तेचे युनिट 1A आणि 1B चे मूल्यमापन २८ जुलै ते ३१ जुलै २०२६** या कालावधीत घेण्यात आले. या मूल्यमापनाचा उद्देश मुलांच्या **ध्वनीशास्त्र (Phonics)** आणि **संख्याज्ञान (Numeracy)** विषयांतील आकलनाचे मूल्यांकन करणे हा होता. वयोगटानुसार उपक्रमाधारित मूल्यमापन फ्लॅशकार्ड, शैक्षणिक साहित्य, ठोस शिक्षणसाहित्य (Concrete Materials) आणि मार्गदर्शित संवादाच्या माध्यमातून घेण्यात आले. या प्रक्रियेमुळे मुलांना आत्मविश्वासाने आपले ज्ञान सादर करण्याची संधी मिळाली तसेच शिक्षकांना प्रत्येक मुलाच्या प्रगतीचे, त्याच्या जमेच्या बाजूंचे आणि अतिरिक्त मदतीची गरज असलेल्या क्षेत्रांचे मूल्यांकन करता आले. या उपक्रमांमुळे मुलांचा सक्रिय सहभाग, आत्मविश्वास आणि मूलभूत शैक्षणिक कौशल्ये अधिक बळकट झाली.

# STUDENT VOICE AND WELL-BEING

## Ashadhi Ekadashi



The Ashadhi Ekadashi Assembly was organized on 24 July 2026 for Grades 4–7 to celebrate and highlight the spiritual and cultural significance of Ashadhi Ekadashi. The assembly began with a warm welcome, prayer, and thought for the day, followed by an informative speech that helped students understand the importance of this auspicious occasion. Students from Grades 4 and 5 presented devotional Abhangs, showcasing Maharashtra's rich devotional tradition. Students from Grades 6 and 7 added vibrancy to the celebration through cultural dances inspired by the Warkari tradition. The performances encouraged students to appreciate our cultural heritage and traditions. The assembly concluded with a vote of thanks and the National Anthem. The winners of the Abhang Competition were also felicitated during the celebration, motivating students to participate enthusiastically in cultural activities.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

**आषाढी एकादशी**

२४ जुलै २०२६ रोजी इयत्ता ४ थी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आषाढी एकादशीचे आध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. सभेची सुरुवात स्वागत, प्रार्थना आणि आजच्या विचाराने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून सांगणारे माहितीपूर्ण भाषण सादर करण्यात आले. इयत्ता ४ थी आणि ५ वीच्या विद्यार्थ्यांनी भक्तिमय अभंग सादर करून महाराष्ट्राच्या समृद्ध भक्तीपरंपरेचे दर्शन घडवले. इयत्ता ६ वी आणि ७ वीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाच्या परंपरेवर आधारित सांस्कृतिक नृत्य सादर करून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती व परंपरांविषयी आदर आणि अभिमान निर्माण करण्यास मदत झाली. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शन आणि राष्ट्रगीताने झाली. तसेच अभंग स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात

## Tiger's Day

On 29 July 2026, Grade 1A conducted a special assembly to celebrate International Tiger Day. The assembly aimed to create awareness about tiger conservation, the importance of protecting forests, and the need to preserve wildlife and natural habitats. Through engaging student-led presentations, a role play, and a lively dance performance, students conveyed meaningful messages about protecting tigers and caring for nature. The activities helped students understand the importance of wildlife conservation in an age-appropriate and engaging manner. Students confidently demonstrated their public speaking, presentation, teamwork, creativity, and performance skills. The assembly also encouraged active participation and collaboration among students. Birthdays and 100% attendance were recognized, promoting a positive and encouraging school culture. Overall, the assembly inspired students to become responsible caretakers of nature and adopt environmentally friendly habits while developing appreciation and respect for wildlife.

**वाघाचा दिवस**



२९ जुलै २०२६ रोजी इयत्ता १ ली ‘अ’मध्ये आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाघांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि वन्यजीव व नैसर्गिक अधिवास जपण्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणे, भूमिकानाट्य आणि उत्साहपूर्ण नृत्य यांच्या माध्यमातून वाघांचे संरक्षण आणि निसर्गाची काळजी घेण्याचा संदेश दिला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व मनोरंजक आणि कृतीशील पद्धतीने समजले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सार्वजनिक भाषण, सादरीकरण, सांघिक कार्य, सर्जनशीलता आणि सहभाग यांसारखी कौशल्ये दाखवली. तसेच विद्यार्थ्यांचे वाढदिवस आणि १००% उपस्थिती** साजरी करून सकारात्मक शालेय संस्कृतीला प्रोत्साहन देण्यात आले. या सभेमुळे विद्यार्थ्यांना निसर्गाची काळजी घेण्याची आणि वन्यजीवांचा आदर करण्याची प्रेरणा मिळाली.

# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

## Nature Conservation Day




Nature Conservation Day was celebrated on 28 July 2026 for students from Nursery to Grade 2 to develop awareness about protecting nature and caring for the environment. The programme began with a brief introduction on the importance of trees, plants, animals, and maintaining clean surroundings. Students actively participated in engaging activities such as a Nature Pledge, Poster Colouring, Nature Walk, Tree Conservation Talk, and an Environmental Awareness Activity. Through these activities, students learned simple and meaningful eco-friendly habits, including saving water, avoiding littering, reducing plastic use, planting trees, and caring for plants. The celebration encouraged creativity, teamwork, active participation, and environmental responsibility among young learners. All classes from Nursery to Grade 2 participated enthusiastically. The programme successfully helped students develop love and respect for nature and encouraged them to become responsible and environmentally conscious citizens.

### निसर्ग संवर्धन दिन

निसर्ग संवर्धन दिन २८ जुलै २०२६ रोजी नर्सरी ते इयत्ता २ रीच्या विद्यार्थ्यांसाठी उत्साहाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाचे संरक्षण, पर्यावरणाची काळजी आणि स्वच्छ परिसराचे महत्त्व याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात झाडे, वनस्पती, प्राणी आणि नैसर्गिक संसाधनांचे महत्त्व याविषयीच्या संक्षिप्त परिचयाने झाली. विद्यार्थ्यांनी निसर्ग प्रतिज्ञा, पोस्टर रंगकाम, निसर्गभ्रमण, वृक्षसंवर्धनावरील संवाद आणि पर्यावरण जागरूकता उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पाणी वाचवणे, कचरा न करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, झाडे लावणे आणि त्यांची काळजी घेणे यांसारख्या पर्यावरणपूरक सवयी शिकल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाबद्दल प्रेम, जबाबदारी, सर्जनशीलता, सहकार्य आणि पर्यावरण संवर्धनाची भावना विकसित झाली.

## Doctor's Day

Doctors' Day was celebrated through the activity "Thank You, Doctors – Our Real-Life Heroes" for students from Grades 3 to 9. The programme aimed to help students understand the valuable role of doctors and develop respect and gratitude towards healthcare professionals. Students participated in engaging activities such as the Mystery Object Challenge, where they identified a stethoscope and discussed its importance; a Myth or Fact Quiz, which helped them learn interesting facts about doctors and healthy habits; and a Role Play – Guess the Doctor, where students portrayed different specialists such as pediatricians, dentists, eye doctors, and emergency doctors. Students also created Thank You Cards and contributed messages to a Gratitude Wall. The programme concluded with a pledge to respect doctors, follow healthy habits, and appreciate healthcare workers. Students from all classes actively participated and enjoyed the celebration.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

# NMMC SCHOOL NO. 93 (CBSE), NERUL

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

### डॉक्टर्स डे




डॉक्टर्स डे निमित्त “धन्यवाद डॉक्टर – आमचे खरे हिरो” हा उपक्रम इयत्ता ३ री ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला. डॉक्टरांची महत्त्वपूर्ण भूमिका विद्यार्थ्यांना समजावी आणि त्यांच्या कार्याबद्दल आदर व कृतज्ञता निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजक आणि माहितीपूर्ण उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. ‘मिस्ट्री ऑब्जेक्ट चॅलेंज’ मध्ये विद्यार्थ्यांनी स्टेथोस्कोप ओळखून त्याचा उपयोग समजून घेतला. ‘मिथ ऑर फॅक्ट क्विझ’ द्वारे डॉक्टर आणि आरोग्यदायी सवयींबाबत माहिती मिळवली. ‘गेस द डॉक्टर’ या भूमिकानाट्यात विद्यार्थ्यांनी बालरोगतज्ज्ञ, दंतवैद्य, नेत्रतज्ज्ञ आणि आपत्कालीन डॉक्टरांच्या भूमिका साकारल्या. विद्यार्थ्यांनी डॉक्टरांसाठी आभार संदेश लिहून कृतज्ञता भिंतीवर प्रदर्शित केले. शेवटी विद्यार्थ्यांनी डॉक्टरांचा आदर करण्याची, निरोगी सवयी अंगीकारण्याची आणि आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञ राहण्याची प्रतिज्ञा घेतली.

## Inter-House Chess Competition

The Inter-House Chess Competition was conducted for students of Grades 6 to 9 to promote strategic thinking, concentration, decision-making, and sportsmanship, while identifying talented chess players for upcoming school-level competitions. The Qualifier Round was held on 20 July 2026, followed by the Semi-Finals and Finals on 23 July 2026. A total of 64 students actively participated in the competition and demonstrated their skills, logical thinking, patience, and strategic planning across the different rounds. The competition provided students with an opportunity to showcase their chess abilities in a healthy and competitive environment. It also helped develop confidence, focus, problem-solving skills, and positive sportsmanship among the participants. The winners were selected to represent the school in upcoming school-level chess competitions. Overall, the event successfully encouraged students to engage in chess and provided a platform to identify and nurture promising young chess players.



### आंतरगृह बुद्धिबळ स्पर्धा

विद्यार्थ्यांमध्ये रणनीतीपूर्ण विचार, संयम, निर्णयक्षमता आणि खिलाडूवृत्ती विकसित करण्यासाठी तसेच गुणवान बुद्धिबळपटूंची निवड करण्यासाठी इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आंतरगृह बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेची पात्रता फेरी २० जुलै २०२६ रोजी घेण्यात आली, त्यानंतर उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी २३ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत इयत्ता ६ वी ते ९ वीच्या एकूण ६४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेचा, तर्कशक्तीचा आणि रणनीतीचा प्रभावी वापर करत विविध फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, एकाग्रता, संयम आणि सकारात्मक स्पर्धात्मक भावना विकसित झाली. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांची आगामी शालेय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धांसाठी निवड करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले कौशल्य दाखवण्याची तसेच पुढील स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

AKANKSHA
Aspire. Achieve. Be the Change.

## Inter-House Standing Broad Jump Competition

The Inter-House Standing Broad Jump Competition was conducted for Grade 4 students as part of the school's Inter-House athletics programme. The event aimed to assess and develop students' lower-body strength, explosive power, balance, coordination, and overall physical fitness. Students from all four Houses participated enthusiastically and performed the standing broad jump according to standard athletics rules. Each participant was given multiple attempts, and the best jump was recorded for evaluation. A total of 64 students participated in the competition. The event provided students with an opportunity to demonstrate their athletic abilities in a healthy and competitive environment while developing confidence, discipline, sportsmanship, and a positive attitude towards physical activity. The competition also served as a selection trial to identify talented athletes who may represent the school at the Akanksha Inter-School Competition. The selected students will be finalized based on their performance.




### आंतरगृह स्थिर लांब उडी स्पर्धा

इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या आंतरगृह क्रीडा उपक्रमाचा भाग म्हणून आंतरगृह स्थिर लांब उडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील पायांची ताकद, स्फोटक शक्ती, संतुलन, समन्वय आणि एकूण शारीरिक तंदुरुस्तीचे मूल्यांकन व विकास करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. चारही गटांतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि क्रीडा नियमांनुसार स्थिर लांब उडीचे प्रदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थ्याला उडी मारण्यासाठी अनेक संधी देण्यात आल्या आणि त्यातील सर्वोत्तम उडीची नोंद करण्यात आली. या स्पर्धेत एकूण ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, खिलाडूवृत्ती आणि सकारात्मक स्पर्धात्मक भावना विकसित झाली. तसेच, आगामी अकांक्षा आंतरशालेय स्पर्धेसाठी गुणवंत खेळाडूंची निवड करण्यासाठी ही स्पर्धा निवड चाचणी म्हणूनही आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कामगिरीच्या आधारे अंतिम निवड करण्यात येणार आहे.

# PARENT COMMUNITY ENGAGEMENT AND DEVELOPMENT

**One-to-One Goal Setting Meetings – July Report**

During the month of July, one-to-one goal-setting meetings were conducted with all students and their parents at the beginning of the academic year. These meetings were facilitated by the class teachers to collaboratively identify personalized goals for each child.

The discussions focused on three key areas: Academic Development, Social-Emotional Learning (SEL) and Life Skills. Teachers guided parents and students in identifying each child's strengths, areas for improvement, and learning priorities. Individual academic targets, along with goals related to confidence, communication, responsibility, collaboration, and self-management, were discussed and documented.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

Akanksha — Aspire. Achieve. Be the Change.

Parents actively participated by sharing their expectations and committing to support their child's learning journey at home. The collaborative approach strengthened the partnership between the school and families, ensuring that every student began the academic year with clear, achievable, and measurable goals for holistic development.

**जुलै महिन्यात आयोजित वैयक्तिक ध्येय-निश्चिती बैठक**

जुलै महिन्यात शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी सर्व विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसोबत वैयक्तिक ध्येय-निश्चिती (One-to-One Goal Setting) बैठका आयोजित करण्यात आल्या. या बैठकींचे नियोजन व मार्गदर्शन वर्गशिक्षकांनी केले.

या बैठकीत शैक्षणिक प्रगती (Academic Development) तसेच सामाजिक-भावनिक शिक्षण (SEL) आणि जीवनकौशल्ये (Life Skills) या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या बलस्थानांची, सुधारणा आवश्यक असलेल्या बाबींची आणि वैयक्तिक शिकण्याच्या उद्दिष्टांची चर्चा करून वर्षभरासाठी स्पष्ट ध्येय निश्चित करण्यात आले. तसेच आत्मविश्वास, संवादकौशल्य, जबाबदारी, सहकार्य आणि स्व-व्यवस्थापन यांसारख्या जीवनकौशल्यांच्या विकासावरही भर देण्यात आला.

पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रवासात घरी आवश्यक ते सहकार्य करण्याची तयारी दर्शवली. शाळा, पालक आणि विद्यार्थी यांच्या संयुक्त सहभागामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्षाची सुरुवात स्पष्ट, साध्य आणि मोजता येतील अशा ध्येयांसह केली, ज्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाला बळ मिळाले.

**SMC Monthly Meeting Report – July 2026**

The monthly School Management Committee (SMC) meeting was conducted in July to discuss and plan the activities for the upcoming month of August.



The meeting focused on the preparation for the 15th August Independence Day celebration, school bag weight audit, school safety audit, and other important school-related activities. The members discussed the necessary preparations and coordinated responsibilities for the smooth implementation of the planned activities.

The meeting helped in building consensus among SMC members regarding the August action plan and clarified the roles and responsibilities of the members. It also enhanced awareness and preparedness among the members for the upcoming audits and the Independence Day event.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33

Overall, the meeting was productive and helped strengthen coordination, planning, and collective responsibility among the SMC members.

**SMC मासिक बैठकीचा अहवाल – जुलै २०२६**

जुलै महिन्यात शाळा व्यवस्थापन समितीची (SMC) मासिक बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये ऑगस्ट महिन्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे आणि आगामी कृती आराखड्याचे नियोजन करण्यात आले.

बैठकीमध्ये १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाचे नियोजन, विद्यार्थ्यांच्या दप्तराच्या वजनाचे परीक्षण (Bag Weight Audit), शाळेतील सुरक्षा परीक्षण (Safety Audit) तसेच इतर शालेय उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. नियोजित उपक्रमांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तयारी आणि सदस्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत चर्चा करण्यात आली.

ऑगस्ट महिन्यातील उपक्रमांबाबत SMC सदस्यांमध्ये एकमत निर्माण झाले आणि प्रत्येक सदस्याच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या. तसेच आगामी सुरक्षा व दप्तराच्या वजनाच्या परीक्षणासाठी आणि स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी सदस्यांमध्ये जागरूकता व तयारी वाढण्यास मदत झाली.

एकूणच, ही बैठक फलदायी ठरली असून SMC सदस्यांमधील समन्वय, नियोजन आणि सामूहिक जबाबदारी अधिक दृढ करण्यास मदत झाली.

**ASE Alumni Support and Engagement – Grade 8 Parent Orientation Report**

An orientation meeting was conducted for Grade 8 parents as part of the ASE Alumni Support and Engagement initiative. The purpose of the meeting was to introduce parents to the ASE team and provide information about the long-term support available to students and their families from Grade 8 until the child graduates from school.

During the orientation, parents were informed about the importance of keeping essential documents updated and readily available. These included Income Certificate, Aadhaar Card, PAN Card, Address Proof, and other relevant documents. The ASE team explained that maintaining updated documentation is important for accessing future support, school-related processes, opportunities, and assistance.



Parents were also oriented about the role of ASE in supporting the child's educational journey beyond Grade 8 through continued guidance, engagement, and assistance at different stages until school completion.

Outcomes



THE AKANKSHA FOUNDATION
MUMBAI-33

The orientation increased parents' awareness about the ASE support system and the importance of proper documentation. Parents gained a clearer understanding of the long-term support available to their children and their role in keeping essential documents updated.

The session also helped strengthen trust, communication, and collaboration between parents and the ASE team, encouraging families to remain actively engaged in their child's educational journey.

**ASE Alumni Support and Engagement – इयत्ता ८ वी पालक मार्गदर्शन बैठक अहवाल**

ASE Alumni Support and Engagement उपक्रमांतर्गत इयत्ता ८ वीच्या पालकांसाठी मार्गदर्शन बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचा उद्देश पालकांना ASE टीमची ओळख करून देणे तसेच इयत्ता ८ वीपासून विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणाच्या समाप्तीपर्यंत विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबांना उपलब्ध होणाऱ्या दीर्घकालीन मदत व मार्गदर्शनाची माहिती देणे हा होता.

बैठकीदरम्यान पालकांना आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यामध्ये उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, पत्त्याचा पुरावा तसेच इतर आवश्यक कागदपत्रांचा समावेश होता. भविष्यातील शैक्षणिक प्रक्रिया, विविध संधी, सहाय्य व ASE कडून मिळणाऱ्या मदतीसाठी ही कागदपत्रे अद्ययावत असणे आवश्यक असल्याचे पालकांना सांगण्यात आले.

तसेच, इयत्ता ८ वी नंतरही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात ASE ची भूमिका काय असेल, याबाबत पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत विविध टप्प्यांवर मार्गदर्शन, सहभाग आणि आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत माहिती देण्यात आली.

बैठकीचे निष्पन्न

या मार्गदर्शन बैठकीमुळे पालकांमध्ये ASE च्या सहाय्य प्रणालीबाबत जागरूकता वाढली आणि आवश्यक कागदपत्रे व्यवस्थित व अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट झाले. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या दीर्घकालीन सहाय्याची तसेच त्यामध्ये पालकांची असलेली भूमिका याबाबत पालक अधिक माहितीपूर्ण झाले.

या बैठकीमुळे पालक आणि ASE टीम यांच्यातील विश्वास, संवाद आणि समन्वय अधिक दृढ होण्यास मदत झाली. तसेच, विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासात कुटुंबांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी ही बैठक उपयुक्त ठरली.



THE AKANKSHA FOUNDATION MUMBAI-33